**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:-सनित-१६२५/प्र.क्र.९०/१३-स
सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग ,
मंत्रालय, विस्तारीत इमारत,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दि:- ०५ डिसेंबर, २०२५

**वाचा** :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कक मधील तरतूद.

राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रकिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कब मधील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते.

सध्या राज्यामध्ये नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुका जाहीर झालेल्या असून, येऊ घातलेल्या अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे संबंधित प्रशासनिक व पोलिस यंत्रणा सदर निवडणूक प्रक्रियेत गुंतलेली आहे. या कारणास्तव सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी आवश्यक मनुष्यबळ, पोलिस बंदोबस्त, मतदान केंद्रांची उपलब्धता या बाबतीत अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार राज्य विधानसभा किंवा विधानपरिषद किंवा लोकसभा किंवा स्थानिक प्राधिकरण यांचा कोणताही निवडणूक कार्यक्रम हा कोणत्याही संस्थेच्या वर्गाच्या निवडणूकीच्या वेळी येत असल्यामुळे राज्य शासनाच्या मते, कोणतीही संस्था किंवा संस्थांचा वर्ग यांच्या निवडणूका घेणे लोकहिताचे नसेल अशा बाबतीत सहकारी संस्थांची निवडणूक पुढे ढकलण्याबाबत शासनास अधिकार आहे. सदर तरतूद विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त विवेचन विचारात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३कक मधील तरतुदीनुसार राज्यात सध्या सुरु असलेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुका तसेच येऊ घातलेल्या इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ज्या प्रकरणी सहकारी संस्थेची निवडणूक घेण्याबाबत मा. उच्च न्यायालय / मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका (सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) या आदेशाच्या दिनांकापासुन सध्या ज्या टप्यावर आहेत त्या टप्प्यावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पूर्ण होईपर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

तथापि, सदर आदेशात खालील बाबींना सुट देण्यात येत आहे.

१. सहकारी संस्थांच्या निवडणूकीनंतरची पहिली पदाधिकारी निवड करणे.

२. चेअरमन / व्हाइस चेअरमन / अन्य पदाधिकारी यांनी पदाचा राजीनामा देणे अथवा मृत्यु /अनर्हता या कारणांमुळे रिक्त झालेले चेअरमन / व्हाइस चेअरमन / अन्य पदाधिकारी यांची निवड करणे.
३. राजीनामा / मृत्यु / अनर्हता या कारणांमुळे संचालक मंडळातील नैमित्तीकरित्या रिक्त झालेल्या जागेवर अन्य संचालकाची निवड करणे.
४. "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया.
५. मतदार यादी प्रसिद्धीचा टप्पा सुरु असलेल्या संस्था (अशा संस्थांची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईपर्यंत कार्यवाही चालु ठेवता येईल.)

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक २०२५१२०५१३०२४२७९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TEJAL RAMESHRAO PARDE

Digitally signed by TEJAL RAMESHRAO PARDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=019d779a48258636496c1fec0492fd7daa52f3f2c329798028660b47fed6130a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=89128237A4F41B9735DD61762BBCE33E4A0AF82C2F7EAB2825CB61E62611D4AB, cn=TEJAL RAMESHRAO PARDE
Date: 2025.12.05 13:04:31 +05'30'

**(तेजल पारडे)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी:-**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पूणे.
३. विभागीय सहनिबंधक/ जिल्हा उपनिबंधक/ उपनिबंधक/सहायक निबंधक सहकारी संस्था(सर्व).
४. निवडनस्ती, कार्यासन १३ –स.